**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** मंठा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0238 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/05/2024 19:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 12/02/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/02/2024

**Time From (वेळेपासून):** 13:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/05/2024 **Time (वेळ):** 19:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2024 19:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती मंठा ,मंठा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अविनाश तुकाराम जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोसावी पांगरी ,मंठा ,मंठा ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गोसावी पांगरी ,मंठा ,मंठा ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552265777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश अंकुशराव बोराडे | | | 1. मंठा फाटा ,मंठा ,मंठा ,जालना, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक- 22.05.2024

फिर्याद

मी, अविनाश तुकाराम जाधव वय 33 वर्ष व्यवसाय शेती रा.गोसावी पांगरी ता.मंठा जि.जालना मोन 9552265777

मी अॅन्टी करप्शन ब्यूरो जालना येथे हजर राहून समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. दि.12.02.2024 रोजी मी पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेबांना शासकीय पंचासमक्ष तक्रार दिली होती की, " मी अविनाश तुकाराम जाधव वय 33 वर्ष व्यवसा-शेती रा.पांगरी (गोसावी) ता.मंठा जि.जालना मोन 955226577 मी दिनांक 12.02.2024 रोजी पोलीस निरीक्षक सुजित बडे यांचेशी फोन वर संपर्क करुन माझी एका लोकसेवका विरुध्द तक्रार आहे असे सांगुन सविस्तर हकिकत सांगितली होती. त्यानुसार मी त्यांना जालना ते जिंतुर रोडवर वाटुर फाटयाजवळ आपण भेटु असे सांगितले वरुन ते त्या ठिकाणी आले असता तक्रार देतो की मला सन 2021-22 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने मधुन गाय गोठा मंजुर झाला आहे.
सदर योजनेच्या पहिला हप्ता 9243/- रुपये मजुराच्या खात्यात जमा झाले असुन माझ्या पुढील हप्तासाठी मला पंचायत समिती मंठा येथील कर्मचारी महेश बोराडे यांनी 7000/-रुपयेची लाचेची मागणी केलेली आहे. परंतु मला त्यांना पैसे द्यायची इच्छा नाही, पण मी जर त्यांना पैसे दिले नाहीतर ते माझे काम होऊ देणार नाही.
माझे व महेश बोराडे यांचे कोणतेही आर्थिक व्यवहार नसुन काही एक वयैक्तिक वादविवाद नाही. मी आज महेश बोराडे यांची पंचायत समीती मंठा येथे प्रत्यक्ष भेट घेणार असुन बोराडे यांनी किंवा त्यांच्या वतीने इतर कुणी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करावी हि विनंती."
त्यानंतर मी वरील प्रमाणे दिलेली तक्रार दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेबांनी वाचून पाहून तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार खरी आहे काय, याची पडताळणी करण्यासाठी, माझ्यासोबत व्हाईस रेकॉर्डर मशीन चालु करुन व पंच क्र.01 श्री. कांबळे यांचेसह दिनांक 12.02.2024 रोजी पंचायत समिती कार्यालय मंठा येथे पाठवून तक्रार पडताळणी करण्याचा निर्णय बडे साहेबांनी घेतला. त्यानंतर मलां व पंचाना व्हाईस रेकॉर्डर मशीन कशाप्रकारे काम करते याबाबत थोडक्यात प्रात्यक्षिक करुन दाखवले व त्यामध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डींग दुपारी सव्वा वाजेच्या सुमारास चालु करुन मला व पंच क्र.01 श्री. कांबळे असे आम्हा दोघांना पंचायत समिति मंठा येथे बोराडे साहेबांची भेट घेण्यास पाठविले. व्हाईस रेकॉर्डींग सुरू करुन दिल्यानंतर मी व पंच क्र.01 श्री. कांबळे असे मोटार सायकलने मंठा शहराचे समोर मंठा ते जिंतुर जाणाऱ्या रोडलगत सुरक्षित ठिकाणा वरुन पंचयात समिती मंठा येथे पोहोचलो. त्याठिकाणी मी पंच श्री. कांबळे यांचे समक्ष बोराडे साहेबांना बोललो असता तेव्हा आमच्या दोघांमध्ये कामा संबधाने चर्चा सुरु असतांना मी त्यांना सदर कामासाठी कोणी पाच हजार दिलेत, कोणी म्हणतय सात दिलेत, नेमक किती द्यायचे.. असे विचारले असता त्यांनी सात हजार रुपये, तर लागतेत ना..वरच्या सह्या वगेरे घ्यायला.. असे म्हणले असता मी त्यांना सात असे विचारले असता त्यांनी हां.. म्हणुन होकार दिला तसेच त्यानंतर परत आम्हच्या मध्ये कामासंबधाने चर्चा झाली तेव्हा मी बोराडे यांना म्हणलो की, काम करुन घेतो, काही हरकत नाही..पण मी काय म्हणायलो, मी त्यांच्या पेक्षा दोन कमी देणार हे...त्यावर बोराडे हे मला म्हणाले की, चालतय..त्यावर मी बोराडे यांना म्हणलो की, हं.. त्यावर बोराडे मला म्हणाले की, चालतय ना, पाच द्या ना, त्यावर मी बोराडे यांना होकार दिला असता बोराडे यांनी मला परत पाच द्या ना.. असे म्हणून त्यांनी मला पंच क्र.01 कांबळे यांचे समक्ष माझे गाय गोठयाच्या पुढील हप्तासाठी मला(पाच हजार) 5000/- रुपयाची मागणी केली. त्यानंतर त्यांनी मला कामाचे फोटो व वाळुच्या व साहित्य खरेदी केल्याच्या पावता घेऊन येण्याबाबत सांगीतल्याने मी व पंच क्र.01 श्री. कांबळे असे आम्ही दोघे मोटार सायकलने सुरक्षीत ठिकाणी परत आलो.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. बडे साहेब यांनी पंच क्र. 01 श्री.कांबळे व मला विचारपुस करुन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता बोराडे यांनी माझे गाय गोठयाच्या अनुदानाचे पुढील हप्तासाठी मला पंच क्र.

01 कांबळे यांचे समक्ष (5,000) पाच हजार रुपयांची मागणी करुन वाळुच्या पावत्या, साहित्य खरेदी केल्याच्या पावत्या व कामाचे फोटो घेऊन येण्याचे सांगीतले होते. त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब, मी व पंच यांनी वर नमुद कागदपत्रे व फोटो हस्तगत झाले नंतर सापळा आयोजित करण्याचे ठरवले. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला वेळो वेळी माझे मोबाईल वर संपर्क करुन कागदपत्रे व फोटो बाबत विचारणा केली परंतु मी माझ्या वैयक्तीक अडचणी मुळे सदर कागदपत्रे गोळा करु शकलो नाही व माझ्या वैयक्तीक अडचणी मुळे मी पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांना सुध्दा भेटु शकत नसल्याने मी त्यांचे फोन घेणे सुध्दा टाळत होते.
त्यानंतर दिनांक 21.03.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला फोन द्वारे संपर्क केल्याने मी मंठा येथे मंठा ते तळणी रोडचे शेजारी सुरक्षीत ठिकाणी भेटलो तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लाईट यांचे गुणधर्माची माहीती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखवले. त्यानंतर लाच म्हणुन देण्यासाठी श्री.बडे साहेबांनी माझे कडुन 5000/- रुपये घेतले. ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 10 नोटा होत्या. त्यानंतर सदर नोटांना अंन्थ्रासीन पावडर लावून नोटा माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या.बोराडे साहेबांनी माझ्या कडून लाच स्वीकारल्या नंतर माझ्या शर्टाच्या उजव्या हाताची बाही वर करुन लाच स्विकारण्याचा इशारा देण्याबाबत सुचना दिल्या.
त्यानंतर पोलीस अंमलदार शेख यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन एका कापडी पिशवीत टाकून कापडी पिशवी माझ्या गळ्यात शर्टच्या आतील बाजुस अडकवली. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे असे आम्ही दोघेजण सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना होण्यापुर्वी माझे मोबाईल वरुन बोराडे यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला त्यांचा मोबाईल बंद येत असल्याने मी माझे व्हॉटसअप मोबाईल क्रमांक 9552265777 यावरुन बोराडे यांचा व्हॉटसअप क्रमांक 9028062461यावर कॉल केला असता बोराडे यांनी ते त्यांचे शासकीय कामासाठी बाहेरगांवी असले बाबत सांगुन उद्या दिनांक 22.03.2024 रोजी येण्याबाबत सांगीतल्याने पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांच्या सुचने वरुन पोलीस अमलदार श्री.शेख यांनी व्हाईस रेकार्डर बंद केले त्यानंतर सर्वानुमते सापळा कार्यवाही स्थगीत करण्याचा निर्णय पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी घेतला.त्याबाबत सविस्तर पंचनामा सदर ठिकणी करण्यात आला.
त्यानंतर दिनांक 22.03.2024 रोजी मंठा ते उस्वद देवठाणा रोडचे शेजारी सुरक्षीत ठिकाणी हजर असतांना पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लाईट यांचे गुणधर्माची माहीती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखवले व दिनांक 21.03.2024 रोजी सापळा स्थगीती पंचनाम्यात माझ्याकडुन घेतलेले लाच म्हणुन वापरावयाचे 5000/- रुपये असलेले सिलबंद पाकिट पंचा समक्ष फोडुन त्यातील नोटा दिनांक 21.03.2024 रोजीच्या पंचनाम्या सोबत पडताळुणन सदर नोटांना अंन्थ्रासीन पावडर लावून नोटा माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या.बोराडे साहेबांनी माझ्या कडून लाच स्वीकारल्या नंतर माझ्या शर्टाच्या उजव्या हाताची बाही वर करुन लाच स्विकारण्याचा इशारा देण्याबाबत सुचना दिल्या त्यानंतर मी व पंच श्री.कांबळे असे दोघेजण मोटार सायकलने सुरक्षीत ठिकाणवरुन पंचायत समिती मंठा येथे पोहोचलो. तेंव्हा बडे साहेब हे पण सापळा पथकासह सर्व साहित्या सह आमच्या पाठीमागे येवून त्याठिकाणी आले व त्याठिकाणी सापळा लावून थांबले.
परंतु बोराडे हे तेथे नसल्याचे मला त्यांचे कार्यालयातुन समजल्याने मी त्यांना फोन केला असता त्यांनी ते तहसिल कार्यालय मंठा येथे असले बाबत सांगीतल्याने मी पोलीस निरीक्षक श्री.बडे यांना माझ्या मोटार सायकल मागे येण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब व सापळा पथक आमच्या मोटार सायकल मागे तहसिल कार्यालय मंठा येथे आले व तहसिल कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे मोटार सायकल वरुन उतरुन पायीचालत तहसिल कार्यालात गेलो तेव्हा तेथे मला पंच श्री. कांबळे यांच्या समक्ष बोराडे भेटले तेथे आमची कामा संबधाने चर्चा झाली त्यानंतर आम्ही दोघें चहा घेण्यासाठी तहसिल कार्यालय समोरी हॉटेल मध्ये गेलो तेव्हा आमच्या मागे मागे पंच श्री.कांबळे सुध्दा तेथे आले तेव्हा चहा येई पर्यंत आमच्या मध्ये परत कामासंबधाने चर्चा झाली तेव्हा मी बारोडे यांना म्हणलो की, मी आता आपल्या बोलण्याप्रमाणे मी पाच हजार तुम्हाला देऊन टाकतो..असे म्हणुन माझ्या उजव्या खिशातील पाच हजार रुपये बोराडे यांच्या समोर धरले त्यावर बोराडे म्हणाले की, आज काही नाही ..आज नका देऊ मला असे म्हणुन त्यांनी पैसे घेण्यास नकार दिला त्यानंतर आमच्या मध्ये कामा संबधाने बरीच चर्चा झाली परंतु बोराडे यांनी माझ्या कडुन दिनांक 12.02.2024 रोजी ठरल्याप्रमाणे पाच हजार रुपये घेण्यास नकार दिल्याने मी व पंच श्री.कांबळे माझे मोटार सायकलवर बसुन मंठा ते उस्वद देवठाणा रोडचे शेजारी सुरक्षीत ठिकाणी परत आलो तेव्हा. पोलीस निरीक्षक बडे साहेब यांच्या सुचने वरुन पोलीस अमलदार श्री.शेख यांनी माझयाकडील व्हाईस रेकॉर्डर मशिन बंद केले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी पंच क्रमांक 01.श्री.कांबळे यांना गोपनिय ठिकाणा वरुन गेले पासुन परत येई पर्यंत काय काय घटना क्रम झाला असे विचारले असता. श्री.कांबळे यांनी वर नमुद प्रमाणे घडलेली हकिगत थोडक्यात श्री.बडे साहेब यांनी सांगीतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी सदर बाबत सविस्तर पंचनामा केला.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला कामासंदर्भाने पावत्या मिळाला का, कामकाज पुर्ण झाले का ? कधी होणार याबाबत विचारणा करुन उर्वरीत सापळा कार्यवाही करणेसाठी फोन द्वारे संपर्क केला परंतु माझी वयैक्तिक अडचणी मुळे हजर राहु शकत नसले बाबत सांगतीले परंतु त्यानंतर सुध्दा पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला उर्वरीत सापळा कार्यवाहीसाठी हजर राहण्यासाठी फोन द्वारे, मसेज द्वारे संपर्क करत होते परंतु मी त्यांना वयैक्तिक व कौटुंबिक आडचण असल्याने उत्तर देणे टाळत होतो.
दिनांक 22.03.2024 रोजी नंतर सुध्दा परस्पर दोन ते तिन वेळेस मी श्री.बोराडे यांना भेटुन माझे गाय गोठा प्रकरणाचे पुढील हप्ता जमा करण्यासाठी विनंती केली. परंतु आमचे गावातील लोकांसोबत माझे वाद असल्याने अमचे गावातील माझे विरोधक यांनी बोराडे यांना माझ्या विषयी चुकीची माहिती दिल्याने ते माझी भेट घेणे टाळत असुन आता बोराडे माझ्याकडुन पैसे स्विकारणार नाही अशी माझी खात्री झाल्यामुळे आज रोजी पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब हे माझ्याकडे उर्वरीत सापळा कार्यवाही करण्यासाठी आले असतांना मी त्यांना वरील प्रमाणे हकिगत सांगीतली त्यावर पोलीस निरीक्षक श्री.बडे साहेब यांनी मला झाले प्रकरा बाबत लोकसेवक बारोडे यांचे विरुध्द तक्रार द्या असे कळविले वरुन आज रोजी महेश अंकुशराव बोराडे यांचे विरुध्द वरील प्रमाणे तक्रार देत आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावरती टाईप केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती बरोबर व खरी आहे.
समक्ष

(सजित बडे)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्यूरो, जालना.

फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालवरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RAVINDRA DEVIDAS NIKALJE(I (Inspector)) / PIACB **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in Charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA DEVIDAS
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PIACB